(१) ३री

# दिनांक १७-११-२०२२ रोजी आयोजीत राज्य तांत्रिक समितीच्या दुस-या सभेचे इतिवृत्त

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीची दुसरी बैठक दि. १७-११-२०२२ रोजी मा. आयुक्त, मृद व जल संधारण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वुसंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वा. पार पडली. सदर बैठकी स उपस्थित समिती सदस्य-

| अ.क्र. | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री अर्दड मधुकर | आयुक्त,मृद व जल संधारण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० |
| २ | श्री रविंद्र भोसले | संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे |
| ३ | श्री संतोष धोत्रे | अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० |
| ४ | श्री भिमराव मेश्राम | उप संचलाक, भूजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणा |
| ५ | अध्यक्ष, | जानपीर सेवाभावी संस्था, ता. आष्टी, जि. बीड |
| ६ | श्रीमती बिडवे एस. एन. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, उपजीविका, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा |

सदर बैठकिस १४४ प्रकल्पांपैकी ६६ प्रकल्पांचे प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांना सविस्तर प्रकल्प आराखडा सादरीकरण व तपासणीसाठी उपस्थित राहण्याच्या सुचना होत्या त्याची यादी सोबत जोडली आहे. परंतू प्रत्यक्ष ३५ प्रकायं (PIA) उपस्थित होते. त्याचींही यादी सोबत जोडली आहे. तसेच प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक १.० योजनेतील कार्यरत कृषि सहाय्यक श्री गाडेकर राजेश व श्री कुलकर्णी गिरीश हे उपस्थित हाते. बैठकी च्या सुरूवातीला उपस्थित सर्वांचे श्री संतोष धोत्रे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी स्वागत केले. त्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल सादरीकरण व तपासणी या मुद्यांच्या अनुषंगाने बैठकीस सुरूवात झाली.

मुद्दा क्र.१ - मागील बैठकीचे इतिवृत्त कायम करणे- दि. १४/६/२०२२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून त्यास मंजूरी प्रदान केली.

मुद्दा क्र. २ – १४४ प्रकल्पांपैकी ६६ प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणांना सविस्तर प्रकल्प अहवालाचे सादरीकरण करणे बाबत व त्यांची छाननी करणेसाठी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची बैठक आयोजीत करणे आली होती. ६६ पैकी ३५ प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा प्रत्यक्ष बैठकीस उपस्थित होत्या. त्यापैकी रायगड जिल्हयातील ३ प्रकल्पांचे उपजीविका घटकाचे आराखडे सोडून इतर आराखड्याचा भाग (भाग १,२,३) तयार असून उपजीविका घटकाचा आराखडा तयार करण्याचे काम चालू असल्याचे रायगडचे जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा मृद व जल संधारण अधिकारी यांनी सांगितले.

सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये एकूण ९ प्रकल्प ते येणेप्रमाणे दोडामार्ग १,२,३,४,५, ८ व ९ आणि वैभववाडी मध्ये क्र. ६ व ७ असुन सर्व प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम ९० टक्के पुर्ण झाल्याचे जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा मृद व जल संधारण अधिकारी यांनी सांगितले.

जळगाव जिल्हयातील अंमळनेर प्रकल्पांचा सविस्तर प्रकल्प आराखड्याचे भाग १ व २ तयार असून अद्याप पुढील आराखडा तयार करण्याचे काम चालू असल्याचे संबधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने सांगितले.

सोलापूर जिल्हयातील ४ प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवालातील भाग १ व २ तयार असून उर्वरीत सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्याचे काम चालू असल्याचे संबधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने सांगितले.

औरंगाबाद जिल्हयातील खुलताबाद प्रकल्पांचा सविस्तर प्रकल्प अहवाल संबधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांनी सादर केला परंतू प्रत्येक उपक्रमांचे जिओ टॅगिंग करणे अपेक्षित असताना अहवालात कांही उपक्रमांचे जिओ टॅगिंग केले नसल्याचे लक्षात आल्यामुळे अहवाल संबधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेला जिओ टॅगिंग काम पुर्ण करून फेर सादर करावयाच्या सुचनां मा. आयुक्त यांनी दिल्या.

गोंदिया जिल्ह्यातील ५ प्रकल्पांचा समावेश प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत असून त्या सर्व ५ ही प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांचे सादरीकरण प्रकल्पांच्या संबधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने (PIA) केले. परंतू अहवालांची तपासणी केली असता जिओ टॅगिंग चे काम अपुर्ण असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे ते काम पुर्ण करून परीपूर्ण असे सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्यस्तरीय तांत्रिक समितीने संबधित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांना दिले. एकूण १० प्रकल्पांचे सविस्तर अहवालांचे सादरीकरण करण्यात आले.

सविस्तर प्रकल्प अहवालांचे सादरीकरण झाल्यानंतर मा. आयुक्त यांनी उपस्थित प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांना सविस्तर प्रकल्प अहवाल बनविताना खालील मुद्यांच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले-

१) मृद व जल संधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय दि. ६-७-२०२२ नुसार पाणलोट समिती स्थापना करणे
२) उत्पादन पद्धती घटकांतर्गत ग्रामीण भागात शेती आधारीत उद्योग धंद्याच्या अनुषंगाने उपक्रम निवडणे
३) GSDA कडून अस्तित्वांतील विहिरींचे जिओ टॅगिंग साठी अक्षांस व रेखांष उपलब्ध करून घेणे.
४) प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेने GSDA च्या जिल्हा कार्यालयामधून वॉटर टेबल बाबत माहिती उपलब्ध करून घेणे

या नंतर श्री भोसले रविंद्र, संचालक, मृद व जल संधारण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनीही सविस्तर प्रकल्प आराखड्याच्या परीपुर्णतेच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. श्री संतोष धोत्रे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांनी सर्व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणानी सविस्तर प्रकल्प आराखडा लवकरात लवकर पुर्ण करून सविस्तर प्रकल्प आराखड्यात समाविष्ठ कामांचे योग्य जिओ टॅगिग, उपजीविका घटकांतर्गत उत्पादन पद्धती, उपभोक्ता गट व शेतकरी उत्पादक संस्था आणि निवड करावयाचे लाभार्थी व उपक्रम इ. बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

मुददा क्र. ३- वसुंधरा व्हॉटस-अप ग्रुप वर ज्या त्रुटी/अडचणी/मार्गदर्शन साठी संदेश प्राप्त होतात त्याचेवर वेळोवेळी मार्गदर्शन करून/उपाययोजना सांगून निराकरण होणेबाबत व त्यानुसार डीपीआर ची रखडलेले कामकाज मार्गी लावणेस्तव एक-दोन-तीन व्यक्तींचा सेल निर्माण करावा व त्यांनी दैनंदिन प्राप्त व्हॉटस-अप संदेश संबधित विषय तज्ञ, विभाग, पमुख,अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक, (मृ.सं.), मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयुक्त (मृ.सं.) आणि प्रधान सचिव, कृषि व मृद संधारण व जलसंधारण यांच्या गरजेनुसार निदर्शनास आणून व त्यावर मार्गदर्शन मिळवून प्रत्येक अशा संदेशावर कार्यवाही करावी अशा सूचना मा. आयुक्त (मृद व जलसंधारण) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पाणलोट विकास घटक २.० यांनी दिल्या.

समितीच्या बैठकीच्या शेवटी सचिव, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. आयुक्तांच्या मान्यतेने सदर बैठक संपल्याचे जाहीर केले.

सोबत- सभेस उपस्थितांची यादी

मधुकर अर्दड (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, २.०
तथा आयुक्त,
मृद व जल संधारण (म.रा.),
वाल्मी परिसर, औरंगाबाद

सभेस उपस्थित राहण्यासाठी कळविलेली प्रकार्य यांची यादी

| अ.क्र. | प्रकल्प | प्रकार्य |
|---|---|---|
| १ | ठाणे | ताकृअ शहापूर |
| २ | पालघर-१ | मं.कृ.अ. पालघर |
| ३ | पालघर-२ | मं.कृ.अ. साफळे |
| ४ | पालघर-३ | मं.कश्.अ. माणगव |
| ५ | पालघर-४ | मं.कृ.अ. कासा |
| ६ | रायगड-१ | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, कोलाड |
| ७ | रायगड-२ | आरएफओ, रोहा |
| ८ | रायगड-३ | आरएफओ, मुरूड |
| ९ | रागयड-४ | ता.कृ.अ. माणगाव |
| १० | रायगड-५ | ता.कृ.अ. माणगाव |
| ११ | रायगड-६ | ता.कृ.अ. माणगव |
| १२ | रायगड-७ | ता.कृ.अ. माणगव |
| १३ | रायगड-८ | उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, अलिबाग |
| १४ | रायगड-९ | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, कर्जत |
| १५ | रायगड-१० | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, माणगांव |
| १६ | रत्नागिरी-१ | ता.कृ.अ. लांजा |
| १७ | रत्नागिरी-२ | उपविभागीय जल संधारण अधिकारी, दापोली |
| १८ | रत्नागिरी-३ | उप अभियंता, ग्रामीण पुरवठा, चिपळूण |
| १९ | रत्नागिरी-४ | ता.कृ.अ. चिपळूण |
| २० | रत्नागिरी-५ | उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा गुहागर |
| २१ | रत्नागिरी-६ | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, चिपळूण |
| २२ | रत्नागिरी-७ | ता.कृ.अ. गुहागर |
| २३ | रत्नागिरी-८ | उपविभागीय जल संधारण अधिकारी, लांजा |
| २४ | रत्नागिरी-९ | ता.कृ.अ. रत्नागिरी |
| २५ | सिंधुदुर्ग-१ | ता.कृ.अ. दोडामार्ग |
| २६ | सिंधुदुर्ग-२ | उपसंचालक सामाजिक वनीकरण सिंधुदुर्ग |
| २७ | सिंधुदुर्ग-३ | ता.कृ..अ. दोडामार्ग |
| २८ | सिंधुदुर्ग-४ | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जि.प. सावंतवाडी |
| २९ | सिंधुदुर्ग-५ | उपविभागीय जल संधारण अधिकारी, अंबडपाल |
| ३० | सिंधुदुर्ग-६ | उप वन अधिकारी, वनविभाग, सावंतवाडी |
| ३१ | सिंधुदुर्ग-७ | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, फोंडाघाट |
| ३२ | सिंधुदुर्ग-८ | वरीष्ठ भू-वैज्ञानिक भूजल विकास यंत्रणा, सिंधुदुर्ग |
| ३३ | सिंधुदुर्ग-९ | ता.कृ.अ. वैभववाडी |
| ३४ | नाशिक-२ | उपविभागीय जलसंधारण अधिकारी, नाशिक |
| ३५ | जळगांव-१ | ता.कृ.अ. अंमळनेर |
| ३६ | नंदूरबार-१ | ता.कृ.अ. नंदूरबार |
| ३७ | नंदूरबार-२ | ता.कृ.अ. अक्कलकुवा |

| | | |
|---|---|---|
| ३८ | नंदूरबार-३ | ता. कृ.अ. अक्राणी |
| ३९ | नंदूरबार-४ | ता.कृ.अ. तळोदा |
| ४० | पुणे | ता.कृ.अ. खेड |
| ४१ | अहमदनगर-१ | ता.कृ.अ. अकोला |
| ४२ | अहमदनगर-२ | मं.कृ.अ. टाकळी मनुर |
| ४३ | अहमदनगर-३ | ता.कृ.अ. शेवगांव |
| ४४ | सोलापूर-१ | मं.कृ.अ. कुर्डूवाडी |
| ४५ | सोलापूर-३ | मं.कृ.अ. माढा |
| ४६ | सांगली-१ | मं. कृ.अ. शेगाव |
| ४७ | सांगली-२ | मं.कृ.अ. जत |
| ४८ | सांगली-३ | मं.कृ.अ. उमदी |
| ४९ | सांगली-४ | म.कृ.अ. शेगाव |
| ५० | औरंगाबाद-१ | ता.कृ.अ. खुलताबाद |
| ५१ | औरंगाबाद-२ | ता.कृ.अ. खुलताबाद |
| ५१ | औरंगाबाद-३ | मं.कृ.अ. शिउर |
| ५३ | औरंगाबाद-४ | ता.कृ.अ. औरंगाबाद |
| ५४ | औरंगाबाद-५ | ता.कृ.अ. गंगापूर |
| ५५ | औरंगाबाद-६ | ता.कृ.अ. पैठण |
| ५६ | औरंगाबाद-७ | म.कृ.अ. वैजापूर |
| ५७ | नांदेड-४ | मं.कृ.अ. किनवट |
| ५८ | गोंदिया-१ | ता.कृ.अ. आमगांव |
| ५९ | गोंदिया-२ | मं.कृ.अ. सालेकसा |
| ६० | गोंदिया-३ | ता.कृ.अ. सालेकसा |
| ६१ | गोंदिया-४ | मं.कृ.अ. देवरी |
| ६२ | गांदिया-५ | ता.कृ.अ. देवरी |
| ६३ | गडचिरोली-१ | म.कृ.अ. अहेरी |
| ६४ | गडचिरोली-२ | मं.कृ.अ. इटापल्ली |
| ६५ | गडचिरोली-३ | मं.कृ.अ. इटापल्ली |
| ६६ | गडचिरोली-४ | मं.कृ.अ. सिरोंचा |